बापट गुरुजी

# अध्यात्माचा अभ्यास

सामान्यपणे मनुष्याचा ओढा निरनिराळ्या पद्धतीची व्रत-वैकल्ये, ग्रंथपारायणे यासारखी धार्मिक कृत्ये करण्याकडे असतो. बहुतांश वेळी त्यात ईशप्रेमाचा भाग कमी आणि जीवनातल्या सुख-समृद्धीची अपेक्षा जास्त असते. अशी अपेक्षा असणं गैर नसलं तरी विश्वाच्या पालक-चालक शक्तीचा मनस्वी आराधनेशिवाय केलेलं सत्कर्म तितकेसे आध्यात्मिक फळ देत नाही. मुळात धार्मिक उपचार नियमिततेने करणाऱ्या लोकांचं प्रमाण एकंदर समाजाच्या तुलनेने कमीच आहे, त्यातही अशा धार्मिक उपचारांचा कार्यकारण भाव जाणून घेण्याची इच्छा बाळगणाऱ्या जिज्ञासू वृत्तीच्या लोकांचं प्रमाण तर अगदीच अत्यल्प आहे. आध्यात्मिक साहित्याचा प्रचंड वारसा लाभूनही आध्यात्मिकदृष्ट्या जागरूक असलेला समाज दुर्दैवाने आज हिंदुस्थानात तयार होऊ शकलेला नाही. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाप्रमाणे असा समाज पूर्वी अस्तित्वात होता, परंतु कालांतराने कर्मकांडातील उपचार केवळ शिल्लक राहिले आणि



त्यातील आध्यात्मिक ज्ञान लुप्त झालं! कोणत्याही व्यावहारिक शास्त्राप्रमाणेच अध्यात्म शास्त्रातही प्रगती करण्यासाठी अभ्यासू वृत्ती अत्यंत आवश्यक आहे. अध्यात्म म्हणजे नेमकं काय याचं ज्ञान स्वत:चं स्वत:ला होण्यासाठी अभ्यासाला पर्याय नाही. अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने अध्यात्म या विषयाकडे बघितलं तर प्रत्येकाला हे पटल्यावाचून राहणार नाही की जन्माला आलेल्या प्रत्येक मनुष्याचं आणि पर्यायाने समाजाचं कल्याण साधायचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे अध्यात्म होय. मुळात आपला आध्यात्मिक अभ्यासाचा पाया जर भक्कम असेल तर त्यावर आपण स्वत:च्या आणि सामाजिक सर्वंकष प्रगतीची इमारत नक्कीच उभी करू शकतो.

सामान्य मनुष्य कुतूहलापोटी उगाच वाचायचे म्हणून काहीतरी वाचतो, ऐकतो आणि मग सोडूनही देतो. परंतु अध्यात्माचा अभ्यास इतका सोपा खचितच नाही. कारण मुळात अध्यात्म येऱ्या-गबाळ्याचे कामच नव्हे. अर्थात एखादा येरा-गबाळासुद्धा अध्यात्मात उच्चस्तरावर जाऊ शकेल, परंतु तोसुद्धा उच्च प्रतीच्या अभ्यासानंतरच. इतिहासाचं अवलोकन केलं तर लक्षात येतं की लहानपणी अतिशय मूर्ख किंवा 'ढ' म्हणून हिणवली गेलेली मुलं मोठेपणी समाजामध्ये फार मोठं कार्य करून गेली. ज्येष्ठ शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाइन, महाकवी कालिदास किंवा अध्यात्मात परमोच्चपदी पोहोचलेले रामकृष्ण परमहंस या महान व्यक्तींचं जीवनचरित्र हेच सांगतं की कोणीही मूर्ख किंवा अडाणीपणाचा कायमचा शिक्का मारून जन्माला आलेलं नसतं.

थोडक्यात म्हणजे व्यवहार असो वा अध्यात्म, अभ्यासाला पर्याय नाही. कोणतेही सत्कर्म, व्रत-वैकल्य करताना जर प्रत्येक जण असं म्हणू लागला की, 'आम्ही फक्त पडून राहतो, अभ्यास वगैरे काही नको, कोणीतरी दूध, साखर एकत्र करून ती बोंडल्याने आम्हाला पाजा, आम्ही ते गिळायचं काम कसंबसं करू' तर जीवनात काही शक्य होणार नाही. व्यावहारिक जीवनात नाही आणि आध्यात्मिक जीवनात तर नाहीच नाही. मनुष्याला कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे किंवा पराकाष्ठेचे प्रयत्न केले पाहिजेत. या देशात निर्माण झालेल्या प्रत्येक सत्पुरुषाने प्रथम स्वत: प्रचंड तप करून सामर्थ्य संपादन केलं आणि मगच समाजात काम केलं, तेव्हाच ते उच्चपदी पोहोचले.

हिंदुस्थानी अध्यात्म शास्त्रात साधना करताना काही विशिष्ट प्रकारच्या नियमावली सांगितल्या आहेत. जसं सोवळं, स्वच्छता, अपेयपान-अभक्ष्य भक्षण वर्ज्यता, ब्रह्मचर्य इ. साधकाने या नियमावलींचे काटेकोरपणे पालन करणे अपेक्षित असते. या नियमावलींचा नेमका अर्थ काय, त्यांचे प्रयोजन काय, त्याला अपवाद आहेत का याचाही खुलासा पूर्वसुरींनी केला आहे, परंतु याचा खोलवर जाऊन अभ्यास करणारे साधक फार कमी असतात. कुणाच्या तरी सांगण्यावरून मनात काहीतरी संभ्रम निर्माण करायचा, त्या नियमावलींचा बाऊ करून सत्कर्मापासून दूर पळायच्या पळवाटा शोधायच्या, हा सर्वसामान्य मनुष्यस्वभाव असतो. अध्यात्मशास्त्राचा सखोल अभ्यास करणाऱ्यांच्या हे लक्षात येईल की, या नियमावली विशिष्ट कामनापूर्तीचा उद्देश ठेवून साधना करणाऱ्यांसाठी अनिवार्य असल्याचं सांगितलं आहे. परंतु एखादी व्यावहारिक इच्छा आणि अध्यात्मात प्रगती करून परमपदी पोहोचण्याची पारमार्थिक इच्छा या दोन्हींत फार मोठा भेद आहे. जसा प्रकाश आणि अंधाराचा किंवा अग्नी आणि पाण्याचा 'सविरोध' म्हणजेच विरोधपूर्ण संबंध असतो तसाच भौतिक कामनांचा आणि साधनेचा संबंध असतो कारण कामनापूर्ती होताक्षणी केलेलं तप नष्ट होत असतं. किंबहुना केलेलं तप खर्ची पडल्यामुळेच कामनापूर्ती होत असते. याच्या उलट कोणतीही भौतिक सुखाची इच्छा न ठेवता केलं गेलेलं नि:स्वार्थ तप हे 'अविरोध' असतं. उदाहरणार्थ अग्नी आणि तुपाचा अविरोध संबंध आहे. कारण दोघांच्या एकत्रीकरणामध्ये तूप हा अग्नीचाच घटक बनतं आणि अग्नीला अधिक प्रज्वलीत करतं. जो मनुष्य व्यावहारिक कामनांतून निवृत्त होऊन केवळ आध्यात्मिक उन्नतीच्या उदात्त हेतूने प्रेरित होऊन नि:स्वार्थ आणि अविरोध साधना करील त्याला कोणत्याही नियमावलीचं भय बाळगण्याचं कारण नाही. अर्थात याचा अर्थ त्याने बेबंद वागावं असा होत नाही. अध्यात्माचा बारकाईने अभ्यास करून त्याचं चिंतन, मनन केल्याशिवाय या तारतम्याचं आकलन होणार नाही.

अध्यात्माचा अभ्यास करण्याचा अजून एक मार्ग म्हणचे अध्यात्माचा प्रचार होय. जेव्हा जेव्हा प्रचार करण्यासाठी मनुष्य समाजाच्या विविध घटकांपुढे जातो तेव्हा तेव्हा प्रत्येक वेळी त्याच्या मनात त्या विचारांची उजळणी होत राहते. वारंवार निर्माण होणाऱ्या या प्रतिमांमुळे मेंदूतल्या पेशींवर सुसंस्कार होतात आणि त्या मनुष्याची आध्यात्मिक प्रगतीची इच्छापूर्ती कणाकणाने का होईना, पण निश्चितपणे होऊ लागते. मथितार्थ एवढाच की अध्यात्मात प्रगती करण्यासाठी नुसते बुद्धिचातुर्य किंवा नुसती भोळी श्रद्धा उपयोगाची नाही तर या दोन्हींच्या एकत्रीकरणासाठी अभ्यासपूर्ण मनोबैठक प्रत्येक साधकाला निर्माण करता आली पाहिजे.